नि. फौ. प्र. क्र. ७५/२०१८
निशाणी क्र. ११

**शासनातर्फे साक्षीदार क्र. ४ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की–

**माझे नाव** : नंदु सुरेशराव रेवस्कर

**वय** : ३५ वर्ष **व्यवसाय** : शेती

**रा.** पिपळा किनखेडे, कळमेश्वर **जिल्हा** : नागपूर

**शासनातर्फे ए.पी.पी. श्री मिरचे**

१. मी आरोपींना ओळखतो. पोलिसांनी मला मोतीलाल फुलारेच्या घ रापाशी बोलावले होते. दि. ५.४.२०१८ रोजी बोलावले होते. तेथे पोलीस लिखापडी करीत होते. पोलिसांनी आम्हाला पाहील. सही करण्यास सांगितले आम्ही सही केली. पोलिसांनी आम्हाला कागद वाचुन दाखविला. घटनास्थळी मला लाठी पडलेली दिसली. बाकी काही दिसले नाही. मला आता घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. क्र. १२** देण्यात येतो. पोलिसांनी माझ्या समक्ष एक लाठी जप्त केली होती जी की ५ तारखेला घटनास्थळी पडलेली होती. ही काठी मोतीलाल फुलारेच्या ताब्यातुन जप्त केली. दोन दिवस हा काठी घटनास्थळीच पडुन होती. आता मला जप्ती पत्रक दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. क्र १३** देण्यात येतो. आता मला जप्त केलेली काळी आर्टीकल अ दाखविण्यात आली ती तिच आहे.

**उलटतपासणी पुढिल तारखेपर्यंत तहकुब करण्यात येते.**

माझेसमक्ष श्रवणोत्तर स्विकृत

न्या.दंडा. प्र.श्रे.

**दिनांक : ०६.१०.२०१८**

**(व्ही.बी.कांबळे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**कळमेश्वर**

सं. फौ. प्र. क्र. २६३/२०१२
निशाणी क्र. २ वर

**शासनातर्फे साक्षीदार क्र. १ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की-

**माझे नाव** : किशोर भाउलाल पटले

**वय** : २८ वर्ष **व्यवसाय** : मजुरी

**रा.** फेटरी गोडाउन, कळमेश्वर **जिल्हा** : नागपूर

**शासनातर्फे ए.पी.पी. श्री मिरचे**

१. दि २२.६.२०१२ रोजी पोलिसांनी मला विसावा धाबा फेटरी येथे बोलावले होते. कशाकरीता बोलावले होते मला माहीत नाही. पोलिसांनी माझ्या समक्ष कसल्याी प्रकारची कार्यवाही केली नाही. आता मला घटनास्थळ जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहिती नाही. मी आरोपीला ओळखत नाही.

**यावेळी साक्षीदार त्याच्या पहील्या बयानास मुकरला त्यामुळे सरकारी वकीलांनी त्याला उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवानगी दिली.उलटतपास सरकारी वकीलांतर्फे**

मी पंचनामाच्या दिवशी घटनास्थळावरुन जात असतांना पोलिसांनी माझी पंचनाम्यावर सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की माझ्या समक्ष पोलिसांनी आरोपी विनोद कडुन ८ देशी दारुच्या निपा जप्त केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळ जप्ती पंचनामा तयार केला, मला वाचुन दाखविला व त्यानंतर मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की आरोपी माझया ओळखीचा असल्यामुळे मी त्याच्याविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपासणी वकील श्रीमती शेवाळे यांच्यामार्फत.**

नाकारले.

माझेसमक्ष श्रवणोत्तर स्विकृत

न्या.दंडा. प्र.श्रे.
**दिनांक : ०६.१०.२०१८**

(व्ही.बी.कांबळे)
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**
**कळमेश्वर**